आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ मे २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नॉर्डिक देशांमधून भारतात होणारी गुंतवणूक दशकभरात दुप्पट, तर व्यापार चार पटीनं वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं तिसऱ्या भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत प्रतिपादन

- महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारचे चार कंपन्यांशी सामंजस्य करार, २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित

- रासायनिक खतांवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी सेंद्रिय शेतीवर अधिक भर देण्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांच शेतकऱ्यांना आवाहन

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैसे वाढ

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं निधन

**<><><><><><>**

गेल्या दशकभरात नॉर्डिक देशांमधून भारतात होणारी गुंतवणूक २०० टक्क्यानी वाढली असून द्विपक्षीय व्यापारही चौपटीनं वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं संयुक्त निवेदन करताना ते आज बोलत होते. हे संबंध अधिक दृढ करण्यासाठी महत्त्वाची पावलं उचलल्याचं मोदी म्हणाले.

भारतानं ऑक्टोबर २०२५ ला नॉर्वे, आइसलँड या देशांसोबत व्यापार आणि आर्थिक करार केले, तसंच काही महिन्यांपूर्वीच युरोपियन युनियनसोबतही मुक्त व्यापार करार केला. या महत्त्वाकांक्षी कराराद्वारे एका सुवर्णयुगाची सुरुवात होत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

भारत आणि नॉर्डिक देश यांच्यात संशोधन आणि नवोन्मेष भागीदारी दृढ केली जाईल असंही मोदी म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

तिसरी भारत-नॉर्डिक शिखऱ परिषद आज नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह नॉर्वे, स्वीडन, आइसलँड, फिनलँड आणि डेन्मार्कचे प्रधानमंत्री या परिषदेत सहभागी झाले.

या परिषदेआधी मोदी यांनी आइसलँड, फिनलँड, डेन्मार्क या देशांच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. आपल्या दौऱ्याच्या पाचव्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी आज इटलीला रवाना होतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारनं चार कंपन्यांशी आज सामंजस्य करार केले. एनटीपीसीएल, अर्थात राष्ट्रीय औष्णिक उर्जा महामंडळ, अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बजाज उद्योग समूहाच्या ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यासोबत सुमारे साडेसहा लाख कोटी रूपये गुंतवणुकीचे हे सामंजस्य करार आहेत. यातून २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा, तसंच १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

**<><><><><><>**

शेतकऱ्यांनी रासायनिक खतांवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी सेंद्रिय शेतीवर अधिक भर देण्याचं आवाहन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज केलं. भुवनेश्वर इथे पूर्व विभागीय कृषी परिषदेला ते संबोधित करत होते. अनुदानित खतांचा गैरवापर करणाऱ्या तसंच बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांचा पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश चौहान यांनी यावेळी दिले. केंद्र

सरकारनं खत अनुदानासाठी ३९ हजार कोटी रुपयांना मंजुरी दिल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली इथं भारताच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ब्रिक्स परिषदेला रशियाचे अध्यक्ष  व्लादिमीर पुतिन उपस्थित राहणार आहेत. दक्षिण आफ्रिकेतल्या रशियन दूतावासानं समाजमाध्यमावर ही माहिती दिली. पुतीन यांची केवळ एका वर्षातली ही दुसरी भारत भेट असेल. गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी भारताला भेट दिली आणि ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभाग घेतला.

<><><><><>

नीट युजी फेरपरीक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्चरीय बैठक झाली. ही परीक्षा प्रामाणिकपणे आणि संपूर्ण पारदर्शकतेनं घेण्याचा पुनरुच्चार करत प्रधान यांनी परीक्षा प्रक्रियेत याआधी आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी न ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

<><><><><>

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात  आज प्रति लिटर ९० पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीतली ही दुसरी दरवाढ आहे. दिल्लीमध्ये आता पेट्रोलचा दर ९८ रुपये ६४ पैसे, तर डिझेल ९१ रुपये ५८ पैसे, झाला आहे, तर मुंबईत  पेट्रोल १०७ रुपये ५९ पैसे दराने आणि डिझेल ९४ रुपये ८ पैसे दराने मिळत आहे.

या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. सरकार  जनतेची लूट करत असून विशिष्ट उद्योगपतींनाच सूट देत आहे असा आरोप त्यांनी केला.

तर, भाजपानं या वाढीचं समर्थन केलं असून ही दरवाढ इतर देशां◌ंपेक्षा कमी असल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं आज देहराडून इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

१९५४ मधे लष्करात दाखल होऊन ते १९९१ मधे  मेजर जनरल पदावरुन निवृत्त झाले. १९८३ मधे त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकानं सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत गढवाल मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधित्व केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचं मंत्रीपद त्यांनी सांभाळलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातला सुवर्ण चतुष्कोण प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात साकार झाला. २००७ ते २००९ आणि २०११ ते २०१२ असे दोन वेळा ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री होते.

<><><><><>

छत्तीसगढमधला बस्तर विभाग येत्या ५ वर्षात देशातलं सर्वात जास्त विकसित आदिवासी क्षेत्र असेल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज जगदलपूर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. बस्तर नक्षलमुक्त झाल्यानंतर केंद्र आणि राज्यसरकारनं या परिसराच्या विकासाची योजना आखली असल्याचं त्यांनी सांगितलं....

**होल्ड - बाईट - अमित शहा**

त्याआधी सकाळी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मध्य विभागीय मंडळाची २६ वी बैठक जगदलपूरमधे झाली. छत्तीसगढ, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि उत्तराखंडचे मुख्यमंत्री तसंच वरिष्ठ पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

अफगाणिस्तान विरुद्ध होणाऱ्या कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांसाठी भारतीय संघ आज जाहीर झाले. दोन्ही प्रकारांसाठी कर्णधार म्हणून शुभमन गिल तर उपकर्णधारपदी के.एल.राहुलची निवड करण्यात आली. कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसाठी जसप्रित बुमराह आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती दिली आहे तर एकदिवसीय संघातून ऋषभ पंत याला वगळलं आहे.

नवोदित फिरकी गोलंदाज मानव सुथार आणि वेगवान गोलंदाज गुरनुर ब्रार यांना कसोटी संघात स्थान मिळालं आहे. एकदिवसीय सामन्यांत प्रिन्स यादव याची निवड झाली आहे.

**<><><><><>**

भारतीय उद्योजक गौतम अदानी आणि सागर अदानी यांच्या विरोधात न्यूयॉर्कच्या न्यायालयात दाखल केलेले खटले अमेरिकेच्या कायदे विभागानं कायमकरता मागं घेतले आहेत. भारतातल्या सौर उर्जा गुंतवणुकीसंदर्भात तसंच अमेरिकेचे निर्बंध लागू असताना इराणकडून एलपीजी खरेदी केल्याचा आरोप या खटल्यांमधे केला होता.

**<><><><><>**

तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणासाठी, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं ११ मंत्रालयं, महानिबंधक, जनगणना आयुक्त कार्यालय, आणि सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांसाठी मार्गदर्शक सूचनांचा दुसरा मसुदा जारी केला आहे.

नव्या मार्गदर्शक सूचना, तृतीयपंथी व्यक्तींचं कल्याण सुनिश्चित करण्यासाठी कृती-योग्य १० प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करत असल्याचं यात म्हटलं आहे. यात राष्ट्रीय डेटा प्रणालीमध्ये लैंगिक विविधतेचा समावेश, लैंगिक समावेशकतेसाठी कायद्यांचा आढावा, समावेशक कायदेशीर चौकटीची उभारणी, मालमत्तेचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, आरोग्यसेवा आणि कामाच्या ठिकाणी समावेशकता याचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूरमधे राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ८ षटकात बिनबाद १०५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पश्चिम बंगालच्या फालता विधानसभा मतदार संघात २१ मे रोजी होणाऱ्या विधानसभा पोटनिवडणुकीमधून तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहांगीर खान यांनी उमेदवारी मागं घेत असल्याचं जाहीर केलं.

**//<><><><><>//**